prepp
Your Personal Exams Guide

**MH SET 2011 MARATHI PAPER 2 NOVEMBER 27, 2011 QUESTION PAPER**

**NOV- 01211/II**

# MARATHI

## Paper II

## मराठी

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. 'कूडल (जि. सोलापूर येथील संगमेश्वराच्या देवळातील शिलालेख हा मराठीतील पहिला शिलालेख होय'—हे मत कोणाचे ?
   (A) वि. वा. मिराशी
   (B) शं. गो. तुळपुळे
   (C) वि. भि. कोलते
   (D) द. वा. पोतदार

2. मराठी विषयीचे **पाच** शिलालेख कोठे आहेत ?
   (A) पळसदेव
   (B) पाटण
   (C) पंढरपूर
   (D) श्रवणबेळगोळ

3. कोणती भाषाविज्ञानपद्धती पुरोगामी व पश्चाद्गामी या दोन अंगांचा उपयोग करते ?
   (A) ऐतिहासिक
   (B) समाजभाषाविज्ञान
   (C) वर्णनात्मक
   (D) संरचनावादी

4. स्वनशृंखलेतील स्वन जेव्हा आपल्या शेजारी असणाऱ्या स्वनांप्रमाणे बनण्याची प्रवृत्ती दाखवितात, तेव्हा त्या प्रक्रियेस काय म्हणतात ?
   (A) स्वनव्यत्यास
   (B) विसदृशीकरण
   (C) सदृशीकरण
   (D) सदृशस्वनलोप

[P.T.O.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



5. पूरक विनियोग, वैकल्पिक विनियोग, वैधर्म्ययुक्त विनियोग यांना कसली तत्त्वे म्हणतात ?

(A) पदस्वनिमिकीची

(B) स्वनिमनिश्चितीची

(C) विकारसरणीची

(D) वाक्यविश्लेषणाची

6. ज्या भाषिक रूपाचे इतर कोणत्याही भाषिक रूपाशी स्वनात्मक–अर्थात्मक साम्य नसते असे रूप म्हणजे काय ?

(A) स्वनिम

(B) स्वनांतर

(C) पदिम

(D) पदांतर

7. अर्थ म्हणजे काय ?

(A) निर्देश

(B) वर्तन

(C) संकल्पना

(D) विचार

8. कसकस, लाललाल, टकटक हे कोणत्या प्रकारचे शब्द आहेत ?

(A) पूर्णाभ्यस्त

(B) अंशाभ्यस्त

(C) सामासिक

(D) धातू

9. करामत, काळीज, किमया हे शब्द मूळ कोणत्या भाषेतील आहेत ?

(A) संस्कृत

(B) अरबी

(C) हिंदी

(D) उर्दू

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



10. आमरण, दररोज, बिनशर्त हे शब्द कोणत्या समासाची उदाहरणे आहेत ?

(A) तत्पुरुष

(B) अव्ययीभाव

(C) कर्मधारय

(D) मध्यमपदलोपी

11. 'रामाने रावणास मारले' या वाक्यात कर्तरी प्रयोग असून 'मुलाने बैलास मारले' या वाक्यात भावे प्रयोग आहे :

(A) विधानाचा पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(B) विधानाचा पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(C) संपूर्ण विधान चूक

(D) संपूर्ण विधान बरोबर

12. 'नागमंडल', ही नाट्यकृती कोणत्या भाषेतून मराठीत आली आहे ?

(A) तेलुगू

(B) तमिळ

(C) कन्नड

(D) मल्याळम्

13. 'एका कोळियाने' ही भाषांतरीत कृती कोणत्या मूळ लेखकाची आहे ?

(A) अर्नेस्ट हेमिंग्वे

(B) सॉमरसेट मॉम

(C) थॉमस हार्डी

(D) पु. ल. देशपांडे



Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



14. 'पंडिताचे गीत तें माझे हाकारे गा'—असे कोण म्हणाले ?

(A) कवीश्वराचार्य

(B) हयग्रीवाचार्य

(C) नागदेवाचार्य

(D) परशुरामव्यास

15. 'अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार गेला नाही.' ही रचना कोणाची ?

(A) जनाबाई

(B) मुक्ताबाई

(C) सोयराबाई

(D) वेणाबाई

16. जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | मुसलमान मराठी संत कवी | (5) | शं.वा. दांडेकर |
| (2) | महदंबा आद्यमराठी कवयित्री | (6) | रा. चिं. ढेरे |
| (3) | ज्ञानदेव व प्लेटो | (7) | यू.म. पठाण |
| (4) | मराठवाड्यातील शिलालेख | (8) | वा.ना. देशपांडे |
| | | (9) | र.रा. गोसावी |

(A) 1-6, 2-8, 3-5, 4-7

(B) 1-6, 2-7, 3-8, 4-5

(C) 1-5, 2-6, 3-7, 4-8

(D) 1-7, 2-5, 3-8, 4-9

17. 'भक्तविजय' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

(A) तुकाराम

(B) सामराज

(C) महीपती

(D) एकनाथ

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



18. 'पेशव्यांची बखर' या बखरीचा कर्ता कोण ?

(A) कृष्णाजी विनायक सोहनी

(B) मल्हारराव चिटणीस

(C) कृष्णाजी अनंत सभासद

(D) गोविंद खंडेराव चिटणीस

19. 'करमणूक', या नियतकालिकाचे संपादक कोण ?

(A) ना. ह. आपटे

(B) वा.शि. आपटे

(C) ह.ना. आपटे

(D) वा.गो. आपटे

20. 'चंद्रप्रभा विरह वर्णन' ही कादंबरी कोणाची ?

(A) अवंतिका गोखले

(B) साळूबाई तांबवेकर

(C) काशिबाई कानिटकर

(D) आनंदीबाई जोशी

21. जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) धुक्यातून लाल ताऱ्याकडे | (5) गंगाधर गाडगीळ |
| (2) माझा प्रवास | (6) रा.भि. जोशी |
| (3) गोपुरांच्या प्रदेशात | (7) अनंत काणेकर |
| (4) वाटचाल | (8) गोडसे भटजी |
| | (9) पु. ल. देशपांडे |

(A) 1-7, 2-8, 3-5, 4-6

(B) 1-7, 2-9, 3-6, 4-8

(C) 1-7, 2-8, 3-6, 4-5

(D) 1-7, 2-9, 3-6, 4-5

22. जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) अनंततनय | (5) शं. का. गर्गे |
| (2) धनुर्धारी | (6) दि. द. भोसले |
| (3) चारुतासागर | (7) दत्तात्रेय अनंत आपटे |
| (4) दिवाकर | (8) रा. वि. टिकेकर |
| | (9) यशवंत कानिटकर |

(A) 1-7, 2-8, 3-6, 4-5

(B) 1-7, 2-8, 3-6, 4-9

(C) 1-7, 2-5, 3-6, 4-8

(D) 1-8, 2-6, 3-5, 4-9

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. संगीत नाटकांची प्रभावी परंपरा कोणापासून सुरू झाली ?
   (A) गो. ब. देवल
   (B) अण्णासाहेब किर्लोस्कर
   (C) विद्याधर गोखले
   (D) मो. ग. रांगणेकर

24. 'ज्ञानकोशा'चे निर्माते कोण ?
   (A) श्री व्यं. केतकर
   (B) लक्ष्मणशास्त्री जोशी
   (C) रा. ग. जाधव
   (D) मे. पुं. रेगे

25. 'श्री ना. पेंडसे हे ज्याप्रमाणे प्रख्यात कादंबरीकार आहेत त्याप्रमाणे उत्कृष्ट कवीही आहेत' :
   (A) पूर्वार्ध बरोबर; उत्तरार्ध चूक
   (B) पूर्वार्ध चूक; उत्तरार्ध बरोबर
   (C) संपूर्ण विधान बरोबर
   (D) संपूर्ण विधान चूक

26. पुढीलपैकी कोणी वाङ्मयेतिहास लेखन केले **नाही** ?
   (A) ह. श्री. शेणोलीकर
   (B) रा. श्री. जोग
   (C) गंगाधर पाटील
   (D) प्र. न. जोशी

www.prepp.in



27. 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' हे कोणत्या संस्थेचे मुखपत्र आहे ?

(A) महाराष्ट्र साहित्य परिषद

(B) विदर्भ साहित्य संघ

(C) मराठवाडा साहित्य परिषद

(D) मुंबई मराठी साहित्य संघ

28. पहिली मराठी अस्तित्ववादी कादंबरी कोणती ?

(A) सात सक्कं त्रेचाळीस

(B) बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वर

(C) एन्कीच्या राज्यात

(D) कोसला

29. 'बोलगाणी' ह्या काव्यप्रकाराची निर्मिती कोणी केली ?

(A) गंगाधर महाम्बरे

(B) सदानंद रेगे

(C) मंगेश पाडगावकर

(D) शान्ता शेळके

30. पुढीलपैकी अभिनेत्रीचे आत्मकथन कोणते ?

(A) स्नेहांकिता

(B) पानाआडचे फूल

(C) नाच ग घुमा

(D) अजून चालतेचि वाट

www.prepp.in



31. कोणत्या संस्थेने सिद्ध केलेल्या लेखनविषयक नियमांचा स्वीकार महाराष्ट्र शासनाने केला आहे ?

(A) मराठी साहित्य महामंडळ

(B) राज्य मराठी विकास संस्था

(C) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(D) महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ

32. संवादीभ्रमाची कल्पना कोणी मांडली ?

(A) शंकुक

(B) हेमचंद्र

(C) भट्टनायक

(D) कुंतक

33. जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | 'काव्यस्य आत्माध्वनि' | (5) | आनंदवर्धन |
| (2) | 'रीतिरात्मा काव्यस्य' | (6) | वामन |
| (3) | अदोष सगुणो सालंकारौच शब्दार्थो काव्यम् | (7) | विश्वनाथ |
| | | (8) | हेमचंद्र |
| (4) | वाक्यं रसात्मकं काव्यं | (9) | क्षेमेंद्र |

(A) 1-5, 2-6, 3-8, 4-7

(B) 1-6, 2-8, 3-9, 4-5

(C) 1-9, 2-6, 3-8, 4-7

(D) 1-9, 2-6, 3-5, 4-8

34. लोकधर्मी व नाट्यधर्मी हा भेद कोणी केला आहे ?

(A) हेमचंद्र

(B) अभिनवगुप्त

(C) आनंदवर्धन

(D) भरत

www.prepp.in



35. रसविघ्नाची मांडणी कोणी केली आहे ?

(A) आनंदवर्धन

(B) भट्टनायक

(C) अभिनवगुप्त

(D) क्षेमेंद्र

36. 'साहित्यदर्पण' या ग्रंथाचा लेखक कोण ?

(A) भट्टनायक

(B) जगन्नाथ पंडित

(C) माहिमभट्ट

(D) विश्वनाथ

37. आर्थिक संबंधाची कल्पना कोणत्या वादाशी निगडीत आहे ?

(A) मार्क्सवाद

(B) अभिजातवाद

(C) वास्तववाद

(D) अतिवास्तववाद

38. मानसशास्त्रीय कला व साक्षात्कारी कला हा भेद कोणी केला ?

(A) ॲडलर

(B) युंग

(C) फ्रॉईड

(D) प्रिस्कॉट

www.prepp.in
prepp Your Personal Exams Guide



39. इच्छापूर्तीचा साहित्य प्रयोजन म्हणून विचार कोणी केला आहे ?

(A) युंग

(B) ब्रुक्स

(C) आय्. ए. रिचर्डस्

(D) फ्रॉइड

40. कॅथॉर्सिसची कल्पना कोणी मांडली ?

(A) लॉन्जायनस

(B) होरेस

(C) ॲरिस्टॉटल

(D) प्लेटो

41. जोड्या जुळवा :

(1) लयसिद्धान्त — (5) बा.सी. मर्ढेकर

(2) स्वरसरंजनात्मकता — (6) माधव आचवल

(3) मानुषता — (7) प्रभाकर पाध्ये

(4) सचेतन तोल — (8) शरच्चंद्र मुक्तिबोध

(9) गंगाधर पाटील

(A) 1-6, 2-7, 3-8, 4-9

(B) 1-5, 2-7, 3-8, 4-6

(C) 1-7, 2-6, 3-8, 4-9

(D) 1-5, 2-7, 3-9, 4-6

42. रा. भा. पाटणकरांनी कलेच्या द्विध्रुवात्मकतेचा विचार मांडला आणि या बरोबरीनेच त्यांनी रूपनिष्ठ समीक्षेचाही पुरस्कार केला :

(A) या विधानातील पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक आहे

(B) हे विधान पूर्णत: बरोबर आहे

(C) हे विधान पूर्णत: चूक आहे

(D) या विधानातील पूर्वार्ध चूक पण उत्तरार्ध बरोबर आहे

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



43. लोकधाटी आणि नागरधाटी हा भेद कोणी केला आहे ?

(A) रा. चिं. ढेरे

(B) प्रभाकर मांडे

(C) द. ग. गोडसे

(D) मधुकर वाकोडे

44. बा. सी. मर्ढेकर यांच्या 'आर्ट्स अँन्ड मॅन' या ग्रंथाचा अनुवाद कोणी केला आहे ?

(A) मिलिंद मालशे

(B) विलास सारंग

(C) रा. भि. जोशी

(D) प्रभाकर पाध्ये

45. पुढीलपैकी कोणता समीक्षक मार्क्सवादी समीक्षक आहे ?

(A) पु. ग. सहस्रबुद्धे

(B) रा. शं. वाळिंबे

(C) रा. श्री. जोग

(D) गं. बा. सरदार

46. पोलीस आयुक्तांना पत्र लिहितांना पत्राचा मायना कसा असावा ?

(A) माननीय

(B) प्रिय

(C) श्रीयुत

(D) महोदय

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



47. अरविंद मंगरूळकरांनी कोणत्या **चार** विभक्ती मानल्या ?

(A) द्वितीया, चतुर्थी, षष्ठी, संबोधन

(B) प्रथमा, द्वितीया, तृतीया, संबोधन

(C) प्रथमा, तृतीया, पंचमी, संबोधन

(D) तृतीया, चतुर्थी, पंचमी, संबोधन

48. 'शिक्षकांनी ज्ञाननिष्ठा ओळखावी.' या वाक्याचा प्रयोग ओळखा :

(A) कर्मणी

(B) कर्तरी

(C) भावे

(D) कर्म-कर्तरी

49. अलंकार ओळखा :

लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा.

(A) उपमा

(B) रूपक

(C) दृष्टांत

(D) उत्प्रेक्षा

50. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमानुसार आहे ?

(A) शुचिर्भूत

(B) शुचीर्भूत

(C) शूचीर्भूत

(D) शुचीभूर्त

www.prepp.in



**ROUGH WORK**

www.prepp.in



**ROUGH WORK**

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**F**

Signature of Invigilators
1. ........................................
2. ........................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. (In words) ............................

........................................................

# MARATHI
## Paper II

# NOV - 01211

Answer Sheet No. | | | | | |

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **16**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat Number in the space provided on the top of this page. Write your Answer Sheet No. in the space provided for Answer Sheet No. on the top of this page.
2. Write and darken Test Booklet No. on OMR Answer Sheet.
3. This paper consists of **Fifty (50)** multiple choice type of questions.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the responses as indicated below on the correct response against each item.
**Example :** (A) (B) ● (D)
Where (C) is the correct response.
5. Your responses to the items for this paper are to be indicated on the Answer Sheet only. Responses like ( × ) ( ▯ ) ( / ) and **light shaded responses will not be considered/evaluated.**
6. Read instructions given inside carefully.
7. One Sheet is attached at the end of the booklet for rough work.
8. You should return the test booklet and answer sheet **both** to the invigilator at the end of the paper and should not carry any paper with you outside the examination hall.
9. Answers marked on the body of the question paper will not be evaluated.

**परीक्षार्थींसाठी सूचना**

1. या पानावरील वरच्या कोपऱ्यात आपला आसन क्रमांक तसेच आपणास दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. प्रश्नपत्रिका क्रमांक OMR उत्तरपत्रिकेवर दिलेल्या रकान्यात लिहून त्याप्रमाणे काळा करावा.
3. या प्रश्नपत्रिकेत **पन्नास** बहुनिवड प्रश्न आहेत.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा करावा.
**उदा.** (A) (B) ● (D)
जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेमध्येच द्यावीत. उत्तराच्या रकान्यामध्ये ( × ) ( ▯ ) ( / ) व **अस्पष्टपणे काळे केलेले उत्तर ग्राह्य धरले जाणार नाही.**
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. कच्च्या कामासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटी कोरे पान जोडले आहे.
8. या पेपरची परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका **दोन्ही** पर्यवेक्षकांना परत करावी. यातील कोणताही कागद तुमच्या बरोबर परीक्षा केंद्राबाहेर नेण्यास सक्त मनाई आहे.
9. प्रश्नपत्रिकेवर दर्शविलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.